क्र. जमीन २६९७/१२८४/प्र.क्र. ७२६७/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- १८-९-२०००

विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा.
मौजे मानखुर्द न.भू.क्र. १२१ मधील जमीन भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमी. यांना मुंबई - मनमाड पाईपलाईन प्रकल्पासाठी देण्याबाबत....

**ज्ञापन :**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयाबाबतच्या त्यांच्या पत्र क्रमांक कार्या - ३ डी /वशी/७६८/९७, दिनांक ८-९-१९९७ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. या कंपनीस मौजे मानखुर्द येथील न.भू.क्र. १२१ मधील एस.व्ही. (Sectionalising valves) स्टेशन कंट्रोल रुम उभारणीच्या कामासाठी १५० चौ.मी. (१५ मी. X १० मी.) आणि वाल्वपीटच्या कामाकरीता ३६ चौ.मी. (६ मी. X ६ मी.) अशा प्रकारे १८६ चौ.मी. जमीन मंजूरीच्या आपल्या क्रमांक कार्या - ३डी - वशी - ७०१ / ९७ दिनांक ८-९-१९९७ च्या आदेशास महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ मधील नियम ३५ अनुसार सदर जमिनीची प्रचलित बाजारभावाची तात्पुरती किंमत प्रती चौ.मी. रु. २०००/- इतकी मानुन या दराप्रमाणे १८६ चौ.मी. जमिनीच्या सपूर्ण बाजारभावाप्रमाणे होणा-या किंमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या त्या -त्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या प्राईम लेंडिंग रेट प्रमाणे भाडे आकारुन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने नेहमीच्या अटी / शर्तीवर तसेच उपरोल्लेखित दिनांक ८-९-१९९७ च्या आदेशातील अटी / शर्तीवर आणि खालील अतिरिक्त अटीवर कार्योत्तर मंजूरी देण्यास याद्वारे शासन मान्यता देत आहे.

अटी :- १) जिल्हाधिकारी यांनी मंजूर जमिनीची प्रचलित बाजारभावाची किमत सहाय्यक संचालक, नगररचना यांजकडून निर्धारित करुन घेण्यात यावी. अंतीम किंमत तात्पुरत्या रक्कमेपेक्षा अधीक असल्यास फरकाची भाडेपट्टयाची रक्कम शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे व्याज आकारुन वसूल करावी.

२) चिल्ड्रेन अँड सोसायटी या संस्थेकडून १८६ चौ.मी. जमीन काढून घेण्यात येवून त्याप्रमाणे सरकारी दप्तरी फेरफार करण्यात यावा व नंतर जमीन प्रतिग्रहित्यास भाडेपट्टयाने देण्याबाबत कार्यवाही करावी.

३. हे ज्ञापन, नगर विकास विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या त्यांच्या क्रमांक विअप्र १०९२/प्र.क्र. १४८/९२/विनिमय, दिनांक १/८/१९९२ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

22 SEP 2000
1950

(विजय पाचकवडे)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.
प्रशासकी इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ५१

प्रतिलीपी:-

१) आयुक्त , कोकण विभाग, कोकण भवन,वाशी, नवी मुंबई

२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश मुंबई

४) महालेखापाल,महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता)(लेखा) मुंबई/नागपूर

५) जिल्हा उपनिबंधक (३) सहकारी संस्था, तळमजला, म्हाडा इमारत, वांद्रे, मुंबई - ५१

६) सहाय्यक संचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा

७) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

८) वित्त विभाग, (व्यय-९), मंत्रालय, मुंबई

९) ज-३ कार्यासन, (**निवडनस्ती**),महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com


155

क्र. :-सी/कार्या-३डी/एल-६९२

दिनांक :- 20/7/2002

वाचले :- १) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन-२६९७/१२८४/प्रक्र.७२६७/ज-३, दिनांक १८/९/२०००.

२) या कार्यालयाचे पत्र कार्या-३डी/वशि-७०१/९७, दिनांक ८/९/१९९७ व दिनांक २४/११/२००१.

**आदेश :-**

मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या कंपनीस मोजे मानखुर्द येथील नभूक्र.१२१ मधील एस.व्ही. (Sectionalising valves) स्टेशन कंट्रोल रुम उभारणीच्या कामासाठी १५०चौ.मी. (१५मी x १०मी) आणि वॉल्वपीटच्या कामाकरीता ३६चौ.मी. (६मी x ६मी) अशाप्रकारे १८६चौ.मी. जमीन मंजूरीच्या उपोद्घातात अनुक्रम २ वर नमूद केलेल्या या कार्यालयाचे दिनांक ८/९/१९९७ च्या पत्रास महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट) नियम १९७१ मधील नियम ३५ अनुसार सदर जमीनींची प्रचलित बाजारभावाची तात्पुरती किंमत प्रती चौ.मी. रु.२०००/- इतकी मानून या दराप्रमाणे १८६चौ.मी. जमीनीच्या संपूर्ण बाजारभावाप्रमाणे होणा-या किंमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या त्या त्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या प्राईम लॅन्डींग रेट प्रमाणे भाडे आकारुन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने नेहमीच्या अटी/शर्तीवर तसेच उपरोलेखित दिनांक ८/९/१९९७ च्या आदेशातील अटी/शर्तीवर आणि खालील अतिरिक्त अटीवर कार्योत्तर मंजूरी देण्यास शासनाने त्यांचेकडील दिनांक १८/९/२००० च्या शासन ज्ञापनान्वये मान्यता दिली आहे.

**अटी :-**

१) जमीनीची प्रचलित बाजार भावाची किंमत सहायक संचालक, नगर रचना यांजकडून निर्धारीत करुन घेण्यांत येत आहे. अंतिम किंमत तात्पुरत्या रक्कमेपेक्षा अधिक असल्यास फरकाची भाडेपट्टयाची रक्कम शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे व्याज आकारुन वसूल करणेत येईल.

२) चिल्ड्रेन अँड सोसायटी (Childrens Aid Society) या संस्थेकडून १८६.०चौ.मी. जमीन काढून घेण्यांत येऊन त्याप्रमाणे सरकारी दप्तरी योग्य तो फेरफार करण्यांत आल्यानंतर प्रतिग्रहित्यास भाडेपट्टयाने देण्याबाबत कार्यवाही करणेत येईल.

३) तात्पुरत्या दराप्रमाणे वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम रु.५६,६४४/- सन ९७-९८ पासून भाडेपट्टेदार यांनी अदा करावी. अन्यथा त्यावर प्रचलित दरानुसार व्याज आकारणेत येईल.

४) भाडेपट्टयाच्या दराचे दर दहा वर्षांनी पुनर्रिक्षण करुन सुधारीत भाडेपट्टा आकारण्यांत येईल व सुधारीत भाडेपट्टयाची रक्कम भाडेपट्टेदाराने शासनांस अदा करणे बंधनकारक राहील.

५) ज्या उद्देशासाठी जमीन दिली त्याच प्रयोजनासाठी जमीन वापरावी.

६) वरील अटी शर्ती मान्य असल्याचे हमीपत्रावर लिहून या कार्यालयास १५ दिवसांत सादर करावे.

जिल्हाधिकारी,
स/- मुंबई उपनगर जिल्हाकरिता

मळप्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही आहे

Scanned by CamScanner

प्रति,

व्यवस्थापक,

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.

मुंबई मनमाड पाईप लाईन प्रकल्प,

अे इन्स्टोलेशन शिवडी फोर्ट रोड,

शिवडी (पूर्व), मुंबई-४०० ०१५.

**प्रतिलिपी :-**

१) चिल्ड्रेन अेड सोसायटी यांजकडे माहिती पुढील कार्यवाहीकरीता रवाना.

२) नगर भूमापन अधिकारी चेंबूर यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरीता रवाना.
२/- त्यांना चिल्ड्रेन एड सोसायटी कडून १८६चौ.मी. क्षेत्र काढून घेण्यांत येऊन त्याप्रमाणे सरकारी दप्तरी फेरफार करणेत यावा. नंतर त्या जमीनीचा ताबा भाडेपट्टेदारांस देण्याबाबतची तहसिलदार कुर्ला यांचे समवेत कार्यवाही करावी.

३) तहसिलदार कुर्ला यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरीता रवाना.
२/- त्यांनी सन १९९७-९८ पासून ते आजतागायत थकीत भाडेपट्टयाची रक्कम भाडेपट्टेदाराकडून जमीनीचा ताबा देण्याची कार्यवाही होणेपूर्वी वसूल करुन पुर्तता अहवाल सादर करावा.

४) मा. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय यांजकडे माहितीकरीता सादर.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता.

त्यावरतीवर . जिल्हाधिकारी
यांची सही असे

Scanned by CamScanner